म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें.
विषय बा. वा.
दा. क्र. ८८९०

IRBK 0108810
IRBK-0108810



लय, ठाणे

# डॉ. बाबासाहेब आंबेडक

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर

प्रथम श्रेणी

महाराष्ट्र ... वाचनालय शाखा
अनुक्रम 30994
विभाग बा. बा.
क्रमांक 2268
नों. दि. ....

—: लेखक :—

**शं. ल. थोरात**

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
ग्रं. क्र. ८८९० नों दि .........
वि. बा. बा. ........

किंमत २५ नवे पैसे

प्रकाशक : व्ही. बी. कर्णिक, चिटणीस, महाराष्ट्र प्रादेशिक लोकशिक्षण समिती,
३१९ सोमवार पेठ, पुणे २.

मुद्रक : व्ही. आर. शिंगरे, सर्वोदय मुद्रणालय, ४५० बुधवार पेठ, पुणे २.



# धीट भीमराव

: १ :

मसूर स्टेशनात आगगाडी थांबली.

दहा पाच लोक गाडीतून उतरले.

त्यात तीन लहान मुले उतरली.

तिघानी आपली गाठोडी उचलली.

स्टेशनचे बाहेर तिघजण आले.

त्यानी एक गाडी ठरविली.

गाडी गोरेगावला निघाली.
दिवस मावळत होता.
गाडीत गोष्टी सुरू झाल्या.
बोलता बोलता गाडीवानाने मुलांना विचारले.
" कोठून आला तुम्ही ? "
एकजण म्हणाला, " पाडळीहून आलो. "
" जायचे कोणीकडे गोरेगावात ? "
" रामजी सुभेदाराकडे. "
तरीपण गाडीवान धीर धरून म्हणाला,
" कोण आहे रामजी सुभेदार तुमचा ? "
" माझा बाप आहे. " तो मुलगा म्हणाला.
त्यावर गाडीवान म्हणाला,
" रामजी सुभेदाराची मुले तुम्ही ?
अरेरे, घोटाळा झाला.
मला विटाळ झाला.

माझ्या गाडीला विटाळ झाला.
माझ्या बैलाना विटाळ झाला.
उतरा खाली."
हे ऐकून तो मुलगा म्हणाला,
"तुझा आमचा ठराव झाला आहे.
गोरेगावाला नेऊन सोडायचे ठरले आहे."

हे ऐकून गाडीवान खवळला. तो म्हणाला,
"कसे उतरत नाही पाहातो.
महारांची पोरे तुम्ही. उतरत नाही म्हणता ?

तो गाडीवान उठला.
पोरांची गाठोडी त्याने खाली फेकली.
दंडाला धरून एकेकाला ओढले.
गाडीखाली उतरविले,

मग तो बोलू लागला,
"मी महारांचे भाडे केले हे लोकानी पाहिले तर-
लोक मला उद्या शिवणार नाहीत.

माझ्यावर माझी जात रागावेल.
गाववाले काय म्हणतील मला ?
मी नाही नेणार तुम्हाला गोरेगावला. ”

हे ऐकून तो धीट मुलगा रागावला.
रागाने तो म्हणाला,
“ काय म्हणतोस ?
महारांचा विटाळ होतो तुला ?
गोऱ्या साहेबांचा विटाळ होत नाही का ?
अरे, आम्ही महार खरे.
आम्ही पांडुरंगाची भक्ति करतो.
ज्ञानेश्वरी वाचतो. गाथा वाचतो.
आम्हाला किडामुंगीसारखे झटकता काय ? ”

पण या बोलण्याचा उपयोग नाही.
लोक विचारच करीत नाहीत,
हे त्याच्या थोरल्या भावाला माहीत होते.

तो म्हणाला, " हे पहा गाडीवान, भाडे दुप्पट घ्या.
पण आम्हाला गोरेगावला न्या.
तुम्हाला मुलेबाळे आहेत ना ?
तिन्हीसांजा या रानात कोठे सोडता ?
अंधारात आम्ही जावे तरी कसे ?

" दुप्पट भाडे " म्हणताच
गाडीवानाच्या तोंडाला पाणी सुटले.
तो म्हणाला, " होय. मलाही मुले आहेत.
तुम्हा मुलाना अंधारात कसा सोडीन मी ?
पण माझा इलाज नाही.
जातवाले रागावतील.
त्यांचा राग काढण्यासाठी दोन रुपये द्या, म्हणजे झाले."
मुलानी ते कबूल केले.
गाडी गोरेगावला निघाली.

# गाडीतील धीट मुलगा, म्हणजेच भीमराव आंबेडकर



मोठेपणी लोक त्याना म्हणू लागले,
डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर.



# लढायला शीक



लोक महार मांगाना शिवत नव्हते.

त्यामुळे भीमरावाला खूप त्रास सोसावा लागला.

भीमरावाच्या लहानपणच्या या गोष्टी आहेत.

एकदा काय झाले, भीमराव रानात होते.

त्याना खूप तहान लागली होती.

जवळच ओढा वाहात होता.

भीमराव ओढ्यावर गेले.

दोनचार घोट पाणी प्याले.

तोंच तिकडून चारपाच गुराखी आले.

त्यानी ओळखले.

हा महाराचा पोरगा.

ओढ्यावर पाणी प्याला.

याने आपला ओढा बाटवला.

एक गुराखी म्हणाला,

" आमचा ओढा कां बाटवला रे ? "

लगेच दुसऱ्याने त्याच्या अंगावर काठी मारली.

भीमरावाला काठ्यानी मारले.

भीमरावाचे अंग काळे निळे झाले.

त्याच खेडयातील ही दुसरी गोष्ट.

भीमरावाचे केस वाढले होते.

त्याला वाटले केस कापून घ्यावेत.

म्हणून हे लहानगे भीमराव न्हाव्याकडे गेले.

न्हावी म्हैस भादरीत होता.

भीमराव लांबून पहात होते.

म्हैस भादरून झाली.

तेव्हां न्हावी म्हणाला,

" तूं कशाला आलास रे इकडे ? "

लहानगा भीम म्हणाला,

"माझी हजामत करायची आहे."



न्हावी म्हणाला,
"महाराच्या पोराची हजामत आम्ही नाही करीत."

भीमाला फार वाईट वाटले.
अपमान गिळणार तरी कोठवर?
रडत रडतच तो घरी आला.

दारातच त्याची बहीण तुळसा होती.
तिने विचारले,

" रडायला काय झाले ? "

भीम म्हणाला,

न्हावी माझी हजामत करीत नाही. "

तुळशी म्हणाली.

" अरे त्यात रडायचंय काय ?

महाराच्या वाट्याला ही दुःखं असायचीच.

त्यासाठी रडायचं नाही. लढायचं.

लढायला शीक, लढायला."

असे म्हणून तुळसाने कात्री घेतली.

भीमरावाचे केस झपाझप कापून टाकले.

भीमरावाला असा सारखा त्रास होत होता.

अपमानाचे दुःख सोसावे लागत होते.

हे दुःख नाहीसे कसे होईल ?

याचा त्याने विचार केला.


आपण विद्या शिकलो तर

विद्येच्या बळावर आपणास चांगले दिवस येतील.

अपमान होणार नाही.
असा त्यांनी विचार केला.

त्यांनी विद्या शिकण्याचा निर्धार केला.
त्यामुळेच भीमराव खूप शिकले.

ते परदेशाला गेले.
बॅरिस्टर झाले.
भारताचे कायदामंत्री बनले.
त्यांनीच स्वतंत्र भारताचा पहिला कायदा तयार केला.



अनुक्रम 30998
विभाग
क्रमांक
नों. वि.

म. ग्रं. सं. ठाणे. ग्रन्थालय शाखा.
ग्रा. क्र. 8810 नों. दि.
वि.

IRBK-0108810